महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळमजला, मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१

दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६

Email: ddtpho_pune@rediffmail.com
ddtp.ho@maharashtra.gov.in

---

## -: प्रसिध्दीपत्रक :-

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागाच्या आस्थापनेवरील उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब / अराजपत्रित) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरणेबाबतची प्रक्रिया संचालनालयाच्या स्तरावर सुरु आहे. उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब / अराजपत्रित) या पदाची ऑनलाईन लेखी परीक्षा दि.२६.११.२०२४ रोजी पार पडली असून, सदरहू परीक्षेचा निकाल संचालनालयास प्राप्त झाला आहे.

०२. उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब / अराजपत्रित) या पदांच्या सदरहू ऑनलाईन परीक्षेच्या प्राप्त निकालानुषंगाने व्यावसायिक चाचणी परिक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची व्यावसायिक कौशल्य चाचणी परीक्षा रविवार दि.१७.०८.२०२५ रोजी एम.आय.टी. आर्ट, डिझाइन आणि टेक्नोलॉजी विद्यापीठ, राजबाग लोणी काळभोर, पुणे – ४१२२०१ या परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात येत आहे. व्यावसायिक चाचणी परीक्षा ही एकाच दिवशी, एकाच परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात येणार आहे. सदरहू व्यावसायिक चाचणी परीक्षेच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांना परीक्षेचे प्रवेशपत्र संचालनालयाच्या स्तरावरुन ईमेलद्वारे लवकरच पाठविण्यात येत आहे. तसेच, व्यावसायिक चाचणी परीक्षेसंबंधित सर्वसाधारण सूचना नगर रचना संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत.

( विजयकुमार ल. वाघमोडे )
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा,
उपसंचालक, नगर रचना,
मुख्य कार्यालय, पुणे.

( जितेंद्र ल.भोपळे )
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.